# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे महाराष्ट्र

# राज्यस्तरीय उपक्रम स्पर्धा सन २०२३ - २४

**गट क्र . ४ –** विषय सहाय्यक विषय साधन व्यक्ती समावेशित साधन व्यक्ती विशेष शिक्षक व **ग्रंथपाल गट**

**नवोपक्रमाचे शीर्षक- "अशी वाचती झाली मुले"……**

**स्पर्धकाचे नाव - सौ. मनिषा राजन कडव**

**एम.ए.(मराठी) एम. लिब.**

**ग्रंथपाल ,डी .एस. हायस्कूल, शीव . मुंबई 2**

## नवोपक्रमकर्ता परिचय

**नवोपक्रम शिर्षक –** “अशी वाचती झाली मुले”.....

**नाव –** सौ.मनिषा राजन कडव

**शाळेचे नाव** – डी .एस. हायस्कूल, शीव मुंबई .२२

**पद –** ग्रंथपाल

**शैक्षणिक पात्रता –** एम. ए. (मराठी) एम .लिब.

**मोबाईल नं. –** 81692 39825

**ई-मेल –** mimanu1677@gmail.com

**ब्लॉग –** manishalibrarian.blogspot.com

**एकूण सेवा –** १४ वर्ष

**नवोपक्रमाचे शीर्षक –**अशी वाचती झाली मुले



# अनुक्रमणिका


| अ क्र | घटक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | नवोपक्रमाचे शीर्षक | 1 |
| २ | प्रस्तावना | 2 |
| ३ | नवोपक्रमाची गरज व महत्व | 3,4,5 |
| ४ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | 6,7 |
| ५ | नवोपक्रमाचे नियोजन व कार्यवाही | 8,9,10,11,12,13,14 |
| ६ | नवोपक्रमाची यशस्विता/ फलनिष्पत्ती | 15,16,17 |
| ७ | समारोप | 18 |
| ८ | संदर्भसूची व परिशिष्टे | 19,20,21,22,,23,24,25,26,27,28,29,30 |

## १ . शीर्षक

**नवोपक्रमाचे शीर्षक –** अशी वाचती झाली मुले.....

**नाव –** सौ.मनिषा राजन कडव




गुगल ड्राईव्ह फोटो लिंक-

https://drive.google.com/drive/folders/15i5qFP2O3EBaTLowb1q1E3hAAQZ2Dpud

ब्लॉग लिंक –

manishalibrarian.blogspot.com


युट्युब लिंक

https://youtu.be/3ChN-jXQyJc?si=Gv1NYmMygWx_AGi

# ✳ प्रस्तावना ✳

वाचन हे शिकण्यात मदत करण्यासाठी एक उत्तम साधन आहे. कारण ते संज्ञानात्मक क्षमता सुधारण्यास मदत करते. ज्ञानाचा विस्तार करते आणि भाषा कौशल्य वाढवते. शिकण्यात मदत करण्यासाठी वाचन हे साधन म्हणून वापरले जाऊ शकते. मुलांमध्ये वाचनाची आवडही लहानपणापासूनच रुजवायला हवी. सध्याच्या इंटरनेट च्या युगात मोबाईल टीव्ही यांच्या जाळ्यात मोठी माणसेही नकळत गुरफटत चालली आहेत. मोठ्या व्यक्तींनाही जर या डिजिटल साधनांचा मोह आवरत नाही. तर लहान मुलांचे काय ? त्यामुळे जर पालकांना वाचनाची आवड असेल तर मुलेही आवडीने वाचन करतील. मुलांच्या हातात सतत मोबाईल देण्यापेक्षा चांगली पुस्तके दिली. तर मुलांची एकाग्रता वाढेल. त्यांची शब्द संपत्ती वाढेल. भाषण करणे किंवा लेखन करणे यासाठी ग्रंथ वाचन उपयोगी पडतात . वाचनामुळे मुलांना एका जागी शांत बसण्याची सवय लागते. तसेच सामान्य ज्ञानही वाढते .

लहानपणी लागलेली वाचनाची सवय पुढे आयुष्यभर उपयोगी पडते. कोरोना काळानंतर जेव्हा शाळा सुरू झाल्या तेव्हा मला असे जाणवले, की विद्यार्थी वाचनापासून दुरावले आहेत. वाचनालयातून पुस्तके घरी घेऊन जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे. ज्यांना आपले जीवन समृद्ध करावयाचे आहे त्यांनी वाचन केले पाहिजे. त्यातून ज्ञान प्राप्त तर होतेच शिवाय ज्ञानाने जीवनाला आकार येतो. कोणती पुस्तके आपल्या आवडीची किंवा आवडत्या विषयाशी निगडित आहेत. याचे उपयुक्त मार्गदर्शन पुस्तक परिचयातून मिळते. त्यामुळे "पुस्तक घ्या आणि वाचा " असे विद्यार्थ्यांना न सांगता पुस्तक परिचयातून पुस्तकाचे अंतरंग अंतरंगाचे दालन विद्यार्थ्यांसमोर उघडे करावयाचे ठरवले. जेणेकरून वाचनापासून दुरावलेले विद्यार्थी या पुस्तक परीक्षणाच्या वाचनाच्या माध्यमातून परत येतील. यामुळे मुलांमध्ये वाचन संस्कृतीची जोपासना करण्याची गरज आहे. हे जाणवले त्यातूनच हा उपक्रम हाती घेतला.



# २. नवोपक्रम गरज व महत्त्व

- **गरज**

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. आज विविध विषयातील संशोधनामुळे नवनवीन माहितीची भर पडत आहे. या सर्व विषयांची ग्रंथसंपदा उपलब्ध होत आहे .आज एकविसाव्या शतकात वाटचाल करताना विविध विषयावरील माहिती स्त्रोतांची वाचकाला माहिती होणे गरजेचे आहे. परिपूर्ण व शास्त्रशुद्ध माहिती व अभ्यासाची पूरक अशी माहिती उपलब्ध करून देणे. ही ग्रंथपालांची जबाबदारी आहे. आपण जर हे वाचन साहित्य उपलब्ध करून दिले . तर निश्चितच वाचन संस्कृती जोपासली जाणार आहे. कोरोना काळानंतर आता विद्यार्थ्यांनाही सहजपणे इंटरनेटचा करता येत असल्यामुळे विद्यार्थी वाचनालयात न येता त्यांना हवी असलेली माहिती इंटरनेट द्वारे प्राप्त करत होते. पण ही माहिती शास्त्रशुद्ध आहे की नाही हे तपासून पहात नव्हते. विद्यार्थी स्वतःला हवी असलेली माहिती गुगलवर सर्च करून जेवढ्यास तेवढी माहिती मिळवून स्वतःचे प्रकल्प पूर्ण करत होते. विद्यार्थ्यांना मोबाईल द्वारे सहजपणे माहिती मिळत असल्यामुळे विद्यार्थी ग्रंथालयाकडे वळत नव्हते .यामुळे विद्यार्थ्यांच्या वाचनाच्या सवयीत खंड पडला. विद्यार्थी कोरोना काळात घरी असल्यामुळे त्यांचा बहुतांशी वेळ दूरदर्शनचे कार्यक्रम पहाण्यात खर्च होत होता . तर काही विद्यार्थी बहुतांशी मोबाईलवर गेम खेळणे, व्हिडिओ पाहणे इत्यादी द्वारे मोबाईलच्या आहारी गेल्याने पुस्तक वाचनाकडे त्यांची ओढ कमी झाल्याचे दिसून आले. विद्यार्थी माहिती मिळवण्यासाठी किंवा वाचनासाठी ग्रंथालयातील ग्रंथांचा वापर न करता मोबाईलवरच ऑनलाईन माहिती मिळवण्यास पसंती देत होते.

**आपण पुस्तके वाचत असताना त्यातील व्यक्तिरेखांशी समरस होतो. जणू काही त्यातील घटना आपल्या डोळ्यासमोरच घडत आहेत असे आपल्याला वाटते. त्यातील प्रसंग आपल्या डोळ्यासमोर तरळत राहतात. पण मालिका पाहत असताना मात्र आपण तितकासा विचार करत नाही. पुस्तके मात्र आपल्याला विचार करायला भाग पाडतात. कृती करण्यास प्रेरित करतात. यातूनच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होतो. विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढीसाठी व सर्वांगीण विकास व्हावा व उद्याचा भावी नागरिक सुदृढ समृद्ध असावा म्हणून हा माझा विचार नवोपक्रम निवडीसाठी माझी खरी गरज ठरला.**

**महत्व**

किशोरावस्था ही सर्वात महत्वाची अवस्था आहे. या वयातच मुलांचा सर्वांगीण विकास होत असतो. या काळात मुलांच्या शारीरिक बौद्धिक मानसिक आणि सामाजिक बदल होत असतात, या वयात चांगले विचार जर या वयोगटातील विद्यार्थ्यांसमोर ठेवले . तर हे विद्यार्थी उद्याचे चांगले भावी नागरिक घडतील. वाचनातून मुलांच्या मनावर चांगले संस्कार घडतात . वाचनापासून दूर गेलेले विद्यार्थी पुन्हा पुस्तकाकडे वळावेत. असे सारखे वाटत होते. वाचनाचा छंद रुजणे रुजवणे यामध्ये कोरोना कालावधीत खंड निर्माण झाला होता .नुसते परीक्षण वाचन पुरेसे नाही. तर मूळ पुस्तक वाचन करणे ही महत्वाचे आहे. यासाठी मूळ ग्रंथ वाचनासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे . याशिवाय वाचलेल्या साहित्याची विचार लेखनातून आपले मत मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे . या उपक्रमामुळे वाचकांचा विविध ग्रंथ संदर्भ ग्रंथ हाताळण्याचा आत्मविश्वास वाढविणे . त्यांना सहभागी करून अभिव्यक्त होण्यास मदत करणे .

विद्यार्थी वाचकांना त्यांच्या अभ्यासासाठी पूरक वाचन साहित्य साधे ग्रंथ ,संदर्भ ग्रंथ ग्रंथालयात येणारी विविध मासिके याविषयीची माहिती असणे आवश्यक आहे. यासाठी या सर्व ग्रंथांचा समावेश यात केलेला आहे. ग्रंथालयाची पुस्तकांची ओढ निर्माण करण्यासाठी एखादा उपक्रम राबविण्याची आवश्यकता भासली. विद्यार्थ्यांना वाचनाकडे ग्रंथालयाकडे वळविणे हे अत्यंत गरजेचे वाटू लागले आणि यासाठी "ग्रंथालयात या आणि पुस्तके घ्या वाचा" अशा सूचना देणे फक्त पुरेसे वाटले नाही. म्हणूनच सदरचा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना ग्रंथालयाकडे वळविणे महत्वाचे वाटले.

# नवोपक्रमाचा कालावधी

१) २० जून २०२३ ते २० ऑक्टोंबर २०२३ हा कालावधी उपक्रमासाठी निश्चित केला .

२) **लाभार्थी संख्या –** इयत्ता आठवी व इयत्ता नववी मिळून ८४ विद्यार्थी + शिक्षक + शिक्षकेतर कर्मचारी + वर्तमानपत्रातून पुस्तक परिचय वाचन करणारे वाचक + माझ्या संपर्कातील व्यक्ती व नातेवाईक.

- **उपक्रमाची साधने**

शिक्षकांशी चर्चा, विद्यार्थ्यांशी चर्चा, ई माध्यम, प्रश्नावली उत्तर चाचणी आणि प्रिंट मीडिया ( वर्तमानपत्रातील ग्रंथ इतरांनी लिहिलेली परीक्षणाची कात्रणे स्वतः लिहिलेली वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित झालेली पुस्तक परीक्षणाची कात्रणे)

- **उपक्रमाचे वेगळेपण**

विविध ग्रंथांचे पुस्तकांचे वाचन न करता वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांच्या परीक्षणाचे वाचन करून संबंधित पुस्तक वाचण्यासाठी मुलांना प्रेरित करणे व ग्रंथालयाकडे व पुस्तक वाचनाकडे विद्यार्थ्यांना वळवणे हे या उपक्रमाचे वेगळेपण आहे . वर्तमानपत्र व विविध मासिकांमध्ये प्रकाशित होणारे पुस्तक परीक्षणांची कात्रणे यांची संकलन केलेले होते. या कात्रणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाची इच्छा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे . स्वतः वाचलेल्या पुस्तकांचे परीक्षण लिहून वेगवेगळ्या वर्तमानपत्रात प्रकाशित केलेल्या परीक्षणांचे संकलन करून या कात्रणांच्या वाचनाद्वारे विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचे ठरविले.

वर्तमानपत्रातून पुस्तक परीक्षण प्रकाशित होत असल्यामुळे वर्तमानपत्र वाचकही या परीक्षणाचे वाचन करत होते. हे पुस्तक परीक्षण मोबाईलच्या स्टेटसला ठेवल्यामुळे व संपर्कातील विविध व्हाट्सअप ग्रुपला पाठवीत असल्यामुळे या सर्व वाचक वर्गाने या पुस्तक परीक्षणाचे वाचन केले व प्रतिक्रिया ही दिल्या. पुस्तक वाचनाबरोबर पुस्तक परीक्षण लेखनाच्या स्पर्धाही या उपक्रमाद्वारे घेतल्या गेल्या व इतरही स्पर्धा या नवोपक्रमाद्वारे घेतल्या गेल्या. या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पुस्तके वाचण्यासाठी एक प्रकारची स्पर्धा सुरू झाली. पुस्तक वाचनातून विद्यार्थ्यांना आनंद मिळू लागला . या नवोपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या मनात कुतूहल निर्माण होईल व पुस्तक परीक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनालयकडे वळविणे या उद्देशाने हा उपक्रम राबवायचे ठरवले.

# नवोपक्रमाची उपयुक्तता

वर्तमानपत्र व विविध मासिकांमध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तक परीक्षणाच्या कात्रणांचे संकलन केले . या कात्रणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचण्याची इच्छा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे . स्वतः वाचलेल्या पुस्तकांचे परीक्षण करून वेगवेगळ्या वर्तमानपत्रात प्रकाशित केलेल्या परीक्षणांचे संकलन करून उपक्रम करण्याचे ठरविले. विद्यार्थ्यांच्या मनात पुस्तकांविषयी कुतूहल निर्माण होईल व पुस्तक परीक्षणाच्या वाचनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनालयाकडे वळवता येईल . या उद्देशाने हा उपक्रम करायचे ठरविले.

- या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना पुस्तकाचे अंतरंग व बाह्यरंग यांची ओळख पुस्तक परीक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थी व वाचकांना होईल.
- साधे ग्रंथ ,संदर्भ ग्रंथ, पूरक पठणाची पुस्तके, विविध विषयांची पुस्तके यांचा परिचय विद्यार्थ्यांना या उपक्रमाद्वारे होईल.
- ज्या विद्यार्थ्यांना वाचनाची ओढ आहे. त्यांची भाषाशैली , संवाद कौशल्य , लेखन कौशल्य, इत्यादी मूळ गुण त्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे

- हे विद्यार्थी आपल्या सहपाठींना आपण वाचलेल्या पुस्तकांबद्दल सांगतील यातून त्यांचा व्यक्तिमत्व विकास होईल. अनेक विषयांची याद्वारे त्यांना माहिती होईल. एकमेकांना आपण वाचलेल्या ग्रंथाबद्दल सांगितल्यामुळे एकाच वेळी अनेक ग्रंथांची एकत्रित त्यांना माहिती मिळेल.
- विद्यार्थी ग्रंथालयातील ग्रंथांचा संदर्भ ग्रंथ म्हणून वापर करतील . विविध विषयातील कोणकोणती पुस्तके ग्रंथालयात आहेत हे जाणून घेतील. उदाहरणार्थ – इतिहास विषयक, विज्ञान विषयक, खेळ विषयक, भूगोल विषयक इत्यादी
- स्पर्धा परीक्षांसाठी कोणकोणती पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध आहेत . याची माहिती विद्यार्थ्यांना मिळेल.
  उदाहरणार्थ – होमीभाभा , स्कॉलरशिप इत्यादी.
- विद्यार्थी याद्वारे ग्रंथालयाकडे आकर्षित होतील.

# ३ . नवोपक्रमाची उद्दिष्टे

- **नवोपक्रमामधून काय साध्य होणार आहेत**
  शब्द ज्ञान विकसित होणार
- छंद जोपासला जाणार
- ग्रंथांचे महत्त्व कळणार
- संस्कार घडणार
- आकलन होणार
- कल्पनाविस्तार होणार
- विचार करायला लावणार
- व्यक्तिमत्व विकास होणार
- ज्ञानाच्या कक्षा रुंदावणार
- भावविश्व व अनुभव विश्व

**कोण कोणते बदल होणार आहेत**

- वाचन लेखन संभाषण कौशल्य विकसित होणार
- एकाग्रता वाढीस लागणार आहे
- अभिव्यक्ती व सुजनशीलतेला वाव मिळेल
- अभिरुची, अभिव्यक्ती, अभिवृत्तीस वाव मिळेल
- सर्वांगीण विकास
- अवांतर वाचनातून ज्ञानाच्या कक्षा रुंदावणे

**नवोपक्रमाची उद्दिष्टे**

१. पुस्तकाचे अंतरंग बाह्यरंग यांची ओळख पुस्तक परीक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करून देणे.

२. पुस्तक परीक्षण कात्रणांच्या वाचनाद्वारे विद्यार्थ्यांना संबंधित पुस्तकाचे वाचन करण्याकरिता प्रोत्साहित करणे.

३.विद्यार्थ्यांना त्यांनी वाचलेल्या पुस्तकाचे पुस्तक परीक्षण लेखनास प्रवृत्त करणे.

४. ह्या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना त्यांचे विचार त्यांच्या भावना त्यांच्या कल्पना व्यक्त करण्यास सहाय्य करणे.

## ४ . नवोपक्रमाचे नियोजन व कार्यवाही

कोरोना पूर्व कालावधीमध्ये विद्यार्थी वाचनालयात वाचनासाठी व प्रकल्प करण्यासाठी संदर्भ मिळविण्यासाठी वाचनालयात येत होते. कोरोना काळात इंटरनेटचा वापर वाढल्यामूळे व एका क्लिकवर ही माहिती मिळत असल्यामूळे संदर्भासाठी लागणारी माहिती विद्यार्थी इंटरनेट द्वारे घेऊ लागले. याची त्यांना जणू सवय झाली होती. अभ्यासासाठी किंवा वाचनासाठी लागणारी माहिती सहजपणे ऑनलाईन उपलब्ध होत असे . विद्यार्थी मोबाईल , इंटरनेटकडे आकर्षित झाले. सध्याच्या माहितीच्या युगात इंटरनेट मोबाईलचा वापर करणे आवश्यक आहे . पण ग्रंथालयातील पुस्तकांमधून मिळणारी माहिती घेणे तेवढेच गरजेचे आहे. इंटरनेटवरील माहितीची सत्यता पडताळून न घेता विद्यार्थी त्याचा वापर करतात. इंटरनेटच्या अतिवापरामुळे विद्यार्थी वाचनापासून दूर झाले. याबाबतीत विषय शिक्षकांशी चर्चा केली असता त्यांनाही हा फरक जाणवला . शिक्षकांकडून विद्यार्थी पूरक साहित्य हाताळत नाहीत अशी नाराजी येत होती. संदर्भ साहित्यही विद्यार्थी हाताळत नाही वाचनाची आणि पाठाकडे बघण्याचा दृष्टिकोनही विद्यार्थ्यांचा वेगळा होता. पालकांशी चर्चा केली असता त्यांचे पाल्य माहितीसाठी मोबाईलचा वापर करत असल्याचे त्यांनी सांगितले .म्हणून एक ग्रंथपाल म्हणून मनात हा एक विचार आला. विद्यार्थ्यांना पुन्हा वाचनाकडे वळविणे. हा हेतू मनात ठेवून उपक्रम करण्याची गरज भासली आणि त्यातूनच हा उपक्रम राबविण्याची आवश्यकता जाणवली.

## ४.१ पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी

उपक्रम राबविण्यापूर्वी विद्यार्थ्यांचा ग्रंथालयाकडे वाचनासाठी येण्याचा ओढा अत्यल्प होता. वाचनविषयक व लेखन विषयक भाषण विषयक सहशालेय उपक्रमात भाग घेणाऱ्यांचे प्रमाण अगदी १०% ते १५ % इतके होते .विद्यार्थी वाचनालयात येऊन पुस्तके घेऊन वाचण्याचे प्रमाण अल्प होते . संदर्भ ग्रंथांचा वापरही अत्यंत कमी होत होता. स्वतःचे कल्पनाविचार मोकळेपणांनी मांडले जात नव्हते. शिक्षकांशी चर्चा केली असता याबाबत त्यांच्याकडूनही नाराजी व्यक्त होत होती.

## ४.२ संबंधित व्यक्तींशी तज्ञांशी चर्चा

सदर उपक्रमाविषयी शाळेच्या प्र. मुख्याध्यापिका मा. डॉ. शुभांगी गायकवाड यांच्याशी सर्वप्रथम चर्चा केली आणि या नवोपक्रमाबाबत मार्गदर्शन व अनुमती घेतली . तसेच शाळेतील शिक्षकांशी चर्चा केली. विषय शिक्षकांची चर्चा केली आणि त्यांनी दिलेल्या सूचना विचारात घेतल्या आणि त्यानंतर हा उपक्रमाचा उपक्रम करण्याचा कृती कार्यक्रम निश्चित करण्यात आला .या उपक्रमासाठी परीक्षण कार्यशाळेसाठी वक्ता म्हणून आमंत्रित करण्यात येणाऱ्या पत्रकार व लेखकांची तसेच शिक्षण तज्ञांची चर्चा करून त्यांची उपलब्धता व मार्गदर्शनासाठी चर्चेसाठी चा विषय निश्चित केला.

## ४ .३ आवश्यक साधनांचा वापर

सहभागी विद्यार्थ्यांच्या वाचनविषयक सवयी जाणून घेण्यासाठी पूर्व चाचणी व उत्तर चाचणी फॉर्म भरून घेतला. विद्यार्थ्यांशी चर्चा करून माहिती मिळवली इत्यादी गोष्टींचा वापर माहिती संकलन करण्याकरिता केला.

- वाचन साहित्याची संकलन करण्यासाठी स्वतः लिहिलेली अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या लेखकांची प्रकाशित झालेली साहित्य पुस्तक परीक्षणे साधन म्हणून वापरली. परीक्षणांची प्रिंट /झेरॉक्स कॉपी इत्यादी साहित्याचा सदर उपक्रमासाठी वापर केला.

- उपक्रमासाठी वापरण्यात आलेली प्रिंट कॉपी झेरॉक्स कॉपी या सदर साहित्याची संकलित स्वतंत्र फाईल बनविण्यात आली व ती फाईल त्यातील कात्रणे विद्यार्थ्यांना वाचण्यास दिली.

## ४.४ कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी

सदर उपक्रम राबवीत असताना सुरुवातीला विद्यार्थी प्रतिसाद कमी होता . प्रथमतः उपक्रमात सहभागी होताना अनुत्साही असणारी मुले उपक्रम जस जसा पुढे सरकला तस तशी उत्साहाने सहभागी होऊ लागली . वाचनालयात येऊन मुले वाचन करावयाचे आहे. मला एखादे पुस्तक सुचवा कोणते ? पुस्तक चांगले आहे ? ते सांगा. असे सांगू लागली. सर्वांचा उत्तम सहभाग या उपक्रमात लाभला. जस जसा उपक्रम हा पुढे जात राहिला. तसं तसा विद्यार्थी प्रतिसाद वाढत गेला.

**करावयाच्या कृतींचा क्रम**

१.नियोजन केल्याप्रमाणे इयत्ता आठवी तुकडी अ व इयत्ता नववी तुकडी अ च्या ८४ विद्यार्थ्यांची या उपक्रमासाठी निवड करण्यात आली .

२.उपक्रम पूर्व विद्यार्थ्यांची प्रश्नावली तयार करून पूर्व चाचणी घेतली.

३ या विद्यार्थ्यांसमोर वाचनाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.

४. मोबाईलचा वापर कमी करून प्रत्यक्ष ग्रंथ ग्रंथातून माहिती कशी मिळवता येईल व जास्तीत जास्त ग्रंथांचे वाचन कसे करता येईल हे विशद करण्यात आले.

५. ग्रंथ कसे उपयुक्त आहेत व ग्रंथालयाचे महत्व समजावून सांगण्यात आले.

६. ग्रंथालयाकडे वळण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले

७. या उपक्रमाची कल्पना विद्यार्थ्यांना देण्यात आली बदली तासिकांना परीक्षणाचे वाचन केले.

८. याव्यतिरिक्त घरी वाचण्यासाठी विद्यार्थ्यांना पुस्तक परीक्षणे देण्यात आली . १३आठवड्यांच्या कालावधीत वर्गात प्रत्येकी २६ पुस्तक परीक्षणे वाचली गेली. याव्यतिरिक्त स्वतः घेऊन वाचलेल्या पुस्तक परीक्षण कात्रणांविषयी विद्यार्थ्यांनी तासिकेला इतर विद्यार्थ्यांच्या समोर कथन केले .

९.वाचलेल्या पुस्तक परीक्षणांपैकी आवडलेल्या पुस्तकाची विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात येऊन मागणी केली.

१०. त्यापैकी काही विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात येऊन आवर्जून पुस्तक परीक्षणापैकी मूळ पुस्तके घेऊन वाचली. यातून लक्षात आले की या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वाचन प्रेरणा मिळत आहे.

११. विद्यार्थ्यांसाठी परीक्षण कार्यशाळा आयोजित केली.

या कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांसाठी लेखक आपल्या भेटीला ही कार्यशाळा आयोजित केली असता विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष लेखकांना विविध प्रश्नही विचारले . यातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी आपले विचार कागदावर शब्दबद्ध केले आणि सदर कविता वाचनालयात दिल्या.

११. पुस्तक परीक्षण लेखन स्पर्धा

प्रत्येक विद्यार्थ्याला पुस्तके दिली गेली व वाचलेल्या पुस्तकाचे परीक्षण लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली . यात काही विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांचे परीक्षण लिहिले.

१२. या पुस्तक परीक्षणांचे संकलन करून यांचे हस्तलिखित बनविण्यात आले व माननीय प्रभारी मुख्याध्यापिका डॉ. शुभांगी गायकवाड यांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन करण्यात आले.

१३. याशिवाय उपक्रमातून प्रेरणा घेऊन काही विद्यार्थ्यांनी कविताही लिहिल्या यांचेही संकलन करून त्याचेही हस्तलिखित बनवून मा. प्र.मुख्याध्यापिका डॉ. शुभांगी गायकवाड यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले.

१४. उपक्रम पूर्ण झाल्यानंतर प्रश्नावली देऊन त्यांची उत्तर चाचणी घेण्यात आली.

## ४.५ उपक्रम पूर्ण झाल्या वर केलेली निरीक्षणे व त्याच्या नोंदी

उपक्रम पूर्ण झाल्यानंतर केलेल्या निरीक्षणावरून असे लक्षात आले की मी निवडलेल्या ८४ विद्यार्थ्यांपैकी एकही विद्यार्थी असा नाही ज्याने किमान एक पुस्तक पण वाचले नसेल असा एकही विद्यार्थी नाही .जास्तीत जास्त १३ तर कमीत कमी दोन पुस्तके विद्यार्थ्यांनी वाचलेली आहेत. सर्वप्रथम बदली तासिकांना विद्यार्थ्यांना वाचनाचे फायदे काय आहेत? पुस्तकाचे वाचन अभ्यासात कसे उपयुक्त ठरते? याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. पुस्तक परीक्षणामुळे पुस्तकांची ओळख तर झाली त्याचबरोबर विद्यार्थ्यांना मूळ पुस्तके घेऊन वाचण्याची आवड यातून निर्माण झाली.

पुस्तक परीक्षण वाचनाबरोबरच विद्यार्थ्यांना वाचनालयात कोणकोणत्या विषयाची पुस्तके आहे त्यांची कपाटे कोणती याबद्दल सांगण्यात आले उदाहरणार्थ कथा कादंबरी यांची पुस्तके एक, दोन ,चार ,पाच या कपाटात त्यांची रचना करण्यात आली आहे .याचबरोबर पुस्तक परीक्षण लेखनासाठी परीक्षण कार्यशाळा आयोजित केली गेली होती. यातून विद्यार्थ्यांना पुस्तक परीक्षण कसे लिहावे. याबद्दल माहिती मिळाली त्यानंतर विद्यार्थ्यांना पुस्तक कसे लिहिले जाते. याचे मार्गदर्शन करण्यासाठी लेखक आपल्या भेटीला या कार्यशाळेचे आयोजन केले गेले होते. यातही विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

१) विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग वाढण्यास हातभार लागला.

२) विद्यार्थ्यांच्या सर्जनशील आणि शोधक विचार क्षमतेला चालना मिळण्यात मदत झाली.

३) मुलांमधील लाजरे बुजरेपणा घाबरटपणा कमी होऊन मुले वर्गात समोर येऊन आपण वाचलेल्या पुस्तकांविषयी सांगू लागली.

४) मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन मुले वाचनालयात येऊन त्यांच्या आवडीची पुस्तके घेऊ लागली.

५) मुलांमध्ये वाचलेल्या पुस्तकाविषयी समोर येऊन सांगण्यासाठी स्पर्धा सुरू झाली यातून त्यांचा सर्वांगीण विकास झाला.

६) मुले एकाग्र झाली.

७) मुलांची अधिकाधिक पुस्तक वाचण्यासाठी उत्सुकता वाढीस लागली.

८) काही मुले वाचलेल्या पुस्तकाचे परीक्षण लेखन व काव्य लेखन करू लागली.

९) मुले संदर्भासाठी लागणारी माहिती शोधण्याकरता मोबाईलचा वापर न करता ही माहिती न मिळविण्यासाठी ग्रंथालयात येऊ लागली.

१०) मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

११) विद्यार्थी भाषण स्पर्धेसाठी भाषण लेखनासाठी ग्रंथालयात येऊन ग्रंथालयातील ग्रंथामधून माहिती मिळवू लागले.

१२) साधे ग्रंथ व संदर्भ ग्रंथ यातील फरक विद्यार्थ्यांना ग्रंथ प्रदर्शनामुळे समजला.

१३) संदर्भ ग्रंथांचा वापर कसा करावा हे लक्षात आले.

## ४.६ . कार्यवाहीचे टप्पे

| क्रमांक | कार्यवाही | तारीख |
|---|---|---|
| १ | पूर्वस्थितीचा आढावा | २०-०६-२०२३ |
| २ | मुख्याध्यापिका व शिक्षक यांच्याशी चर्चा | २२-०६-२०२३ |
| ३ | विद्यार्थ्यांना या उपक्रमाबाबत माहिती दिली | २३-०६-२०२३ |
| ४ | उपक्रमाची पहिली तासिका | २६-०६-२०२३ |
| ५ | ग्रंथ प्रदर्शन | २०-०७-२०२३ |
| ६ | भाषिक खेळ उपक्रम | १-८-२०२३ |
| ७ | पुस्तक परीक्षण कार्यशाळा | २६-०८-२०२३ |
| ८ | लेखकांची संवाद | ३-०९-२०२३ |
| ९ | विद्यार्थ्यांच्या परीक्षणांचे प्रदर्शन | १६-०९-२०२३ |
| १० | ग्रंथांच्या जादुई नगरीत व  निसर्गाच्या सानिध्यात या दोन्ही हस्तलिखितांचे प्रकाशन | १३-१०-२०२३ |
| ११ | अहवाल लेखन | २१-१०-२०२३ |

# ४.७ समाविष्ट उपक्रम

**या उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना वाचनामध्ये रुचि निर्माण करण्यासाठी खालील प्रमाणे उपक्रम घेण्यात आले .**

**१ . ग्रंथप्रदर्शन –**

अगाध ज्ञानाचे भंडार असलेले ग्रंथ विविध प्रकारचे असतात . कथा ,कादंबरी ,कविता,प्रवासवर्णन ,चरित्र ,निबंधलेखन विविध कोश इत्यादि वाचनालयात असलेल्या ग्रंथांची माहिती विद्यार्थी वाचकांना व्हावी यासाठी ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले . त्याद्वारे विद्यार्थ्यांना ग्रंथांची माहिती देण्यात आली.

**२. भाषिक खेळ –**

भाषिक खेळामुळे शब्दसंग्रह वाढतो . विद्यार्थ्यांना वेगवेगळे लेखक, , वैज्ञानिक ,शास्त्रज्ञ इत्यादींची माहिती व्हावी यादृष्टीने हा उपक्रम घेण्यात आला . विद्यार्थ्यांना हा खेळ खूप आवडला .

**३. पुस्तक परीक्षण कार्यशाळा –**

विद्यार्थ्यांना पुस्तक परीक्षण म्हणजे काय ? हे माहीत व्हावे व पुस्तक परीक्षण कसे लिहावे ? याचे मार्गदर्शन मिळावे. यासाठी पुस्तक परीक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली . विद्यार्थीनी यात सक्रिय सहभाग घेवून पाहुण्याना प्रश्न विचारून माहिती मिळविली .

**४. लेखक आपल्या भेटीला कार्यशाळा –**

विद्यार्थ्यांना पुस्तके कोणकोणत्या प्रकारची असतात . पुस्तकांची निर्मिती कशी होते . हे समजावे हा या कार्यशाळे मागील हेतु . विद्यार्थ्यांचा या कार्यशाळेसाठी उस्फुर्त प्रतिसाद लाभला . विद्यार्थ्यांनी या कार्यशाळे दरम्यान लेखकांना विविध त्यांना पडलेले प्रश्न विचारले . यातून त्यांना पुस्तक वाचनाचे फायदे ही समजले .

**५ . विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या पुस्तक परीक्षणांचे प्रदर्शन –**

पुस्तक परीक्षण कार्यशाळेने प्रभावित होवून काही विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षणे लिहिली . यातील उत्कृष्ट परीक्षणे निवडून ती पुस्तक परीक्षणे डिस्प्ले करण्यात आली .

**६ . विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तलिखिताचे प्रदर्शन –**

पुस्तक परीक्षण कार्यशाळेने प्रभावित होवून काही विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षणे लिहिली. काही विद्यार्थ्यांनी कविताही लिहिल्या. या दोन्हीची वेगवेगळी हस्तलिखिते तयार करून त्यांचे प्रकाशन करण्यात आले . हे काही उपक्रम नवोपक्रमांदरम्यान घेण्यात आले .

# ४.८ या उपक्रमासाठी इतरांची मदत

या उपक्रमासाठी शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका डॉ. शुभांगी गायकवाड यांच्याकडून प्रेरणा मिळाली. या उपक्रमासाठी त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. पर्यवेक्षिका सौ.कल्पना पाटील व पर्यवेक्षक श्री . ढेकळे सर यांचेही सहकार्य लाभले. पुस्तक परीक्षण निवडीसाठी डॉ. सौ नयना लोखंडे व सौ . पुष्पा लोहकरे यांचे सहकार्य लाभले .परीक्षण कार्यशाळा आयोजित करण्यासाठी डॉ. संजय मोहिते व डॉ.नयना लोखंडे यांचे सहकार्य लाभले पुस्तक परीक्षण वर्तमानपत्रांमध्ये देण्यासाठी श्री. पत्रकार श्री मिलिंद आरोलकर यांनी विशेष सहकार्य केले. विद्यार्थ्यांचे हस्तलिखित बनविण्यासाठी मुखपृष्ठ रेखाटण्यासाठी चित्रकला शिक्षक श्री. मांगले सर यांनी मदत केली. पनवेल डायटच्या ग्रंथपाल माननीय श्रीमती शिल्पा कुलकर्णी यांनी कार्यशाळा घेऊन आम्हाला नवोपक्रमाबाबत मार्गदर्शन केले .

## ४.९ सादर करावयाचे पुरावे

१. उपक्रमादरम्यान घेतलेल्या कार्यशाळांचे फोटो

२) विद्यार्थी पुस्तक देवघेव नोंदवही


३)मान्यवरांचे अभिप्राय

४)उपक्रमां दरम्यान बनविलेली हस्तलिखित

५) उपक्रमांसाठी वापरलेले पुस्तक परीक्षणांची फाईल

# सांख्यिकीय विश्लेषण

पूर्व आणि उत्तर चाचणी साधा स्तंभलेख



## ५ . नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती

**⁕हा उपक्रम केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये झालेले बदल⁕**

⁕ ग्रंथालयातील पुस्तकांची माहिती झाली .
⁕ लेखन कौशल्यास हातभार लाभला .
⁕ संदर्भ पुस्तकांचा वापर कसा करावा हे समजले
⁕ साधे ग्रंथ व संदर्भ ग्रंथ यातील फरक समजला.
⁕ पुस्तकांचे विषय समजले
⁕ वाचनाचे फायदे विद्यार्थ्यांना जाणवले .
⁕ सभाधीटपणास वाव मिळाला . सुप्त असलेली वकृत्व कला जागृत झाली.
⁕ विद्यार्थ्यांच्या संवादात्मक कौशल्यात वाढ झाली
⁕ विद्यार्थ्यांची एकाग्रता विकसित झाली.
⁕विद्यार्थी स्वयं वाचनास प्रेरित झाले.

**⁕राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यातील उद्दीष्टे** ⁕ अध्यापन करताना कोणत्या सहा गोष्टी ध्यानी घ्याव्यात. यातील सर्जनशीलता विकसित होणे  हा मुद्दा . यातील त्यांच्या कल्पनेप्रमाणे व्यक्त होण्यासाठी संधी देणे हा मुद्दा .  येथे पुस्तक परीक्षण लेखन करणे यातून साध्य होतो. अंतर क्रियात्मक वर्गात आपण राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात वर्गात केवळ कथन किंवा व्याख्यान देण्याऐवजी विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक दृष्ट्या अधिक कृतीशील बनवावे अशी अपेक्षा आहे. यासाठी पुस्तकातील प्रत्येक ओळी ओळख वाचत राहून स्पष्टीकरण करीत बसण्याऐवजी विद्यार्थ्यांना त्यांना येणाऱ्या शंका विचारण्यास वाव द्यावा व क्रियाशील बनवावे. हा मुद्दा विद्यार्थ्यांनी मूळ पुस्तके वाचल्यामुळे विद्यार्थी शंका विचारू लागल्यामुळे साध्य होत आहे ३) विविधतेचा आदर भाषेची सांगड घालणे.प्रत्येक समूहाच्या संस्कृतीच्या वैशिष्ट्यांची ओळख विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकातून होते.

**⁕पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळातील वाचन भाषण संभाषण लेखन या तिन्ही क्षमतांचा विकास या नवोपक्रमामध्ये विद्यार्थ्यांमध्ये झाला . त्यामुळे हा नवोपक्रम भाषा विषयक भाषण संभाषण वाचन लेखन या क्षमतांबरोबरच वाचन संस्कृतीचा विकास करण्यास उपयुक्त ठरेल असे मला वाटते.**

**⁕कितपत बदल झाले⁕**

अजिबात पुस्तकांचे वाचन न करणारे वर्गात शांत बसणारे विद्यार्थी यांच्यात वाचनामुळे आत्मविश्वास निर्माण झाला आणि हे विद्यार्थी वर्गात एकमेकांना वाचलेल्या पुस्तकाबद्दल सांगू लागले आणि वाचनालयातून वेगवेगळ्या विषयांच्या पुस्तकांची मागणी करू लागले.

## यशस्विता उद्दिष्टानुसार

**उद्दिष्ट** १) पुस्तकाचे अंतरंग बाह्यरंग यांची ओळख पुस्तक परीक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करून देणे.
**फलश्रुती** १) पुस्तक परीक्षणाच्या परीक्षण कात्रणाच्या वाचनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुस्तकाची पृष्ठ संख्या त्यातील आकृत्या चित्रे यांची माहिती मिळाली.
२) पुस्तक परीक्षण कात्रणाच्या वाचनाच्या माध्यमातून हे पुस्तक उद्बोधक संस्कारक्षम इत्यादी कोणत्या प्रकारातील आहे याची माहिती झाली.
३) या परीक्षण कात्रणाच्या वाचनाच्या माध्यमातून पुस्तकाचा आशय त्यातील विषय कोणता आहे.  याची माहिती झाली.
४) पुस्तकांची पृष्ठे ,पुस्तकांची किंमत किती आहे याविषयी माहिती समजली.
५) पुस्तक परीक्षण कात्रणाच्या पुस्तकातील पात्रांचा परिचय झाला.  हे पुस्तक आपल्यासाठी उपयुक्त आहे का  ?आपल्या आवडीचा विषय यात आहे का ? याची माहिती याद्वारे मिळाली.

**उद्दिष्ट** २) पुस्तक परीक्षण कात्रणाच्या वाचनाद्वारे विद्यार्थ्यांना संबंधित पुस्तकाचे वाचन करण्याकरिता प्रोत्साहित करणे.
**फलश्रुती** १) मनोरंजनाबरोबरच शिक्षणही मिळत असल्यामुळे विद्यार्थी वाचनात रममान झाले  व पुस्तके घेण्यासाठी वाचनालयात येऊ लागले.
२) परीक्षण वाचनामुळे विद्यार्थी त्यांना आवडलेल्या पुस्तकाविषयी वाचनालयात येऊन मागणी करू लागले.
३)या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांना एक प्रकारची वाचनाबाबत दिशा मिळाली.

४)आवडलेल्या पुस्तकाव्यतिरिक्त वेगवेगळ्या पुस्तकेही चाळून पाहू लागले.
५)संदर्भ मिळविण्यासाठी ग्रंथालयात येऊन संदर्भ ग्रंथांची मागणी करू लागले
६)वाचलेल्या पुस्तक परीक्षणापैकी मूळ पुस्तक मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांची एकमेकांमध्ये स्पर्धा सुरू झाली.

**उद्दिष्ट** – ३) विद्यार्थ्यांना त्यांनी वाचलेल्या पुस्तकाचे पुस्तक परीक्षण लेखनास प्रवृत्त करणे.
**फलश्रुती** –१) विद्यार्थ्यांचे वाचन लेखन संभाषण कौशल्य विकसित होण्यास मदत झाली.
२) विद्यार्थी वाचलेल्या पुस्तकाबद्दल वर्गात एकमेकांना सांगू लागले.
३) विद्यार्थी वाचलेल्या पुस्तकाचे पुस्तक परीक्षण लिहू लागले.
४) विद्यार्थी काव्य लेखन करू लागले.
५) विद्यार्थी शाळांतर्गत व शाळाबाह्य भाषण, लेखन, नाट्य सादरीकरण स्पर्धेत भाग घेऊ लागले.

**उद्दिष्ट** –४– ह्या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना त्यांचे विचार त्यांच्या भावना त्यांच्या कल्पना व्यक्त करण्यास सहाय्य करणे.
**फलश्रुती** –१) पुस्तके वाचून मुलांचा आत्मविश्वास वाढला. सभाधीटपणा वाढला .
२)वाचलेल्या पुस्तकाबद्दल विद्यार्थी स्वतः वर्गात समोर येऊन इतर विद्यार्थ्यांना माहिती सांगू लागले.
३)वाचलेल्या पुस्तकाबद्दल माहिती सांगण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा निर्माण झाली.
४)प्रत्येक विद्यार्थ्याला समोर येऊन सांगण्याची संधी मिळाली.
५) काही विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकाची आशयला धरून मुखपृष्ठेही रेखाटली.

सदर उपक्रम राबविल्यामुळे विद्यार्थ्यांनी विविध पुस्तक परीक्षणे स्वतःहून वाचली व वाचनालयात याच प्रकारच्या आणखीन परीक्षणांची मागणी केल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात येऊन त्यांच्या आवडीची पुस्तके निवडली व त्यांची स्वतः परीक्षणे लिहून संशोधकाला दिली. काही विद्यार्थी काव्य लेखन करू लागले.

भाषण स्पर्धेसाठी भाषण लेखनासाठी ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथांचा वापर वाढला. सभाधिटपणा वाढला. विद्यार्थी स्वतः वाचलेल्या पुस्तकाबद्दल वर्गात समोर येऊन सांगू लागले . शाळाअंतर्गत विविध भाषण स्पर्धांमध्ये भाग घेऊ लागले. विद्यार्थ्यांच्या संवादात्मक कौशल्यात वाढ झाली. वाचलेल्या पुस्तकाविषयी एकमेकांशी विद्यार्थी चर्चा करू लागले. विद्यार्थ्यांमध्ये स्वतःचे मत निर्माण होऊन विद्यार्थी स्वतःच्या आवडीचे पुस्तक निवडून वाचू लागले. विविध शब्दांचे अर्थ शब्दकोश व विश्वकोश इत्यादी संदर्भ ग्रंथातून शोधू लागले . स्वतः विद्यार्थी ऑफ तासिकांना वाचनालयात येऊन विविध पुस्तकांबद्दल विचारू लागले . विविध पुस्तकांविषयी माहिती सांगा असे सांगू लागले. हीच या उपक्रमाची यशस्विता आहे.

## नवोपक्रमाची यशस्विता

- पुस्तक परिचय वाचनातून
- वाचनाविषयी आवड निर्माण होणे
- मूळ ग्रंथांचे वाचन करणे
- वेगवेगळ्या विषयाची पुस्तके वाचावीशी वाटणे व वाचणे
- संदर्भ ग्रंथांतून माहिती शोधणे
- वाचलेल्या पुस्तकाचा परिचय लिहिणे
- काव्य लेखनही करणे

- पुस्तक वाचनाचे फायदे
- सर्वांगीण विकास
- शब्दकोशामध्ये वाढ
- छंदाची जोपासना
- आकलन क्षमता विकास
- वाकचातुर्यात वाढ
- कल्पकता विकास
- व्यक्तिमत्व विकास
- संवाद कौशल्य विकास
- विचार कौशल्य विकास

# समारोप

आजचे युगे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे या युगात इंटरनेटचा वापर करणे काळाची गरज आहे. पण इंटरनेटचा अतिवापर शालेय विद्यार्थ्यांसाठी योग्य आहे का? कोरोना काळात जेव्हा घराबाहेर पडणे शक्य नव्हते. अशावेळी या इंटरनेटच्या माध्यमातून विद्यार्थी शिक्षक शाळा एकत्र आले. ही तेव्हा काळाची परिस्थितीची गरज होती. पण या मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांना शारीरिक मानसिक त्रासालाही सुरुवात झाली. डोकेदुखी डोळ्यांची जळजळ, कमी दिसणे, ज्यांना चष्मा आहे. त्यांचा नंबर वाढणे. अशा समस्यांना आज सामोरे जावे लागते आहे. विद्यार्थ्यांनी कोरोंना काळात इंटरनेटचा वापर करून त्यांना हवी असलेली माहिती मिळवली . अभ्यासाकरिता इंटरनेटचा वापरही केला. पण आता सर्व सुरळीत चालले असतानाही विद्यार्थी ग्रंथालयाकडे फार कमी प्रमाणात येत होते . इंटरनेटच्या वापर करणे ठीक आहे . परंतु त्याचबरोबर ग्रंथालयातूनही पुस्तके घेऊन वाचावीत व सर्वच इंटरनेटवरील माहिती विश्वसनीय असते असे नाही. पण ग्रंथालयातील पुस्तकातून मिळणारी माहिती विश्वसनीय असते. तिचा वापर करावा .हा या नवोपक्रमाचा उद्देश. विद्यार्थ्यांनी स्वतःतील सुप्त गुण ओळखणे , स्वतः व्यक्त व्हायला शिकणे, स्वतःतील कलागुणांना वाव देणे हा या उपक्रमा मागील हेतू .

या उपक्रमामुळे निश्चित विद्यार्थ्यांच्या वाचनात वेगळेपणा येऊन त्यात कृतीयुक्तता आनंद व मनोरंजकता आली. विद्यार्थ्यांचा वाचनाकडे व वाचनालयाकडे ग्रंथांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल जाणवला. त्यांच्यात आत्मविश्वास जाणवला. आपणही पुस्तक वाचून त्याचे परीक्षण लिहू शकतो. असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला. या उपक्रमावरून विद्यार्थी आपले म्हणजेच ग्रंथपालांचे किती सखोल निरीक्षण करतात, अनुकरण करतात. याचीही प्रचिती आली. विद्यार्थी पुस्तक वाचनाकडे वळले. वर्तमानपत्रातील पुस्तकांचे परीक्षण वाचू लागल्याचे दिसून आले व ग्रंथालयात येऊन पुस्तकांची मागणी करू लागले. हे या उपक्रमाचे फलित होय.

शिव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सर्व पदाधिकारी डी. एस. हायस्कूल ,शीव . मुंबई शाळेच्या मुख्याध्यापिका शिक्षक विद्यार्थी कर्मचारी वर्ग या सर्वांनी हा उपक्रम साकारण्याच्या निमित्ताने मला प्रेरणा दिली व सहकार्य केले. त्यांच्या प्रति ऋण व्यक्त करणे हे क्रमप्राप्तच आहे. या सर्वांना मी या **"अशी वाचती झाली मूले"** .... या नवोपक्रमाच्या वतीने खूप धन्यवाद देते. या नवोपक्रमाच्या पुस्तक परीक्षण प्रसिद्धीसाठी सहकार्य करणारे पत्रकार श्री मिलिंद आरोलकर सर ,नवे शहर या वृत्तपत्राचे संपादक श्री. राजेंद्र घरत सर या दोघांनीही पुस्तक परीक्षण प्रसिद्धीसाठी मदत केली त्यांचेही आभार. दादर सार्वजनिक वाचनालय कार्याध्यक्ष तसेच पुस्तक परीक्षण लेखक श्री. मनोहर साळवी सर व लेखिका, पत्रकार श्रीमती शुभांगी पासेबंद मॅडम यांनी कार्यशाळेसाठी उपस्थित राहण्यासाठी सहमती दर्शवली व उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे आभार . या उपक्रमासाठी मला घरातूनही सहकार्य लाभले. यासाठी माझे मोठे दीर माजी शिक्षण निरीक्षक श्री. विलास कडव यांचीही मी ऋणी राहीन. पनवेल डायटच्या ग्रंथपाल श्रीमती शिल्पा कुलकर्णी मॅडम यांनी या उपक्रम स्पर्धेविषयी सांगितले व मार्गदर्शन केले व कार्यशाळा ही घेतली. त्याबद्दल मी त्यांचीही शतशः आभारी राहीन.

अशाप्रकारे नवोपक्रमाच्या माध्यमातून पुस्तक परीक्षणाच्या वाचनाद्वारे विद्यार्थी ग्रंथ वाचनाकडे वळले त्यांचा सर्वांगीण विकास झाला. या माझ्या नवोपक्रमाचा फायदा इतर काही शाळांमधील विद्यार्थ्यांना व इतर वाचकांना झाला . या नवोपक्रम स्पर्धेमधून माझा नवोपक्रम सर्वांपर्यंत पोहोचावा व इतरांनाही त्याचा लाभ व्हावा हा उद्देश आहे.

## संदर्भ ग्रंथांची पुस्तकांची यादी

१) पुस्तकाचे नाव-दिशानवोपक्रमाच्या

संपादक- श्री नामदेवराव जरग

प्रकाशन- महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

द्वितीय आवृत्ती ,मार्च -२०१४.


२)पुस्तकाचे नाव - माझा वेगळा उपक्रम

संपादक -श्री नामदेवराव जरग
प्रकाशक - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,पुणे .३०
प्रथम आवृत्ती, मार्च -२०१२

3)Maa.Ac.In https://www.maa.ac.in/

४)https://youtube7BjMmcxHc

## इतर वाचकांचा अभिप्राय



अभिप्राय


डि.एस. हायस्कूल, शीव मुंबई-२२ या शाळेच्या मुख्य ग्रंथपाल सौ. मनिषा कदम यांनी पुस्तक परीक्षणाचा हाती घेतलेला उपक्रम विद्यार्थी-सह शिक्षकांसाठी तसेच शिक्षकांसाठी अत्यंत उपयोगी आहे. विद्यार्थी तसेच शिक्षकांना एखाद्या पाठा विषयी माहिती घेतांना संदर्भ म्हणून ही परीक्षणे अत्यंत प्रभावी ठरत आहेत. पुस्तक वाचण्या आधी पुस्तकाचा मुख आशय कळत असल्याने वाचतांना सर्व संकल्पना स्पष्ट होतात आणि वाचनाची आवड निर्माण होते.

सौ मनिषा मॅडम यांची लेखन शैली सहज सोपी आणि मनाला भावनारी असल्याने वाचक रमून जातो. लेखकाला नेमकं काय सांगायचे आहे, हे अगदी सहजपणे वाचकाच्या मनात उतरविण्याचे कौशल्य त्यांच्या लेखनीत आहे. आज पर्यंत ३८५ पेक्षा जास्त पुस्तकांची त्यांनी परीक्षणे लिहिली आहेत. वर्तमानपत्रे, मासिके यातून त्यांचे अनेक प्रबोधनात्मक लेख, कविता प्रकाशित झाल्या आहेत. एक बालकथा संग्रह, एक लघुकथा संग्रह व एक कविता संग्रह प्रकाशित झालेला आहे. वाचकांनी या पुस्तकांना उदंड प्रतिसाद दिलेला आहे.

सध्या त्यांनी वाचन संस्कृती वाढविण्यासाठी जो हाती प्रकल्प घेतलेला आहे तो विद्यार्थी व शिक्षक यांनी निश्चित मार्गदर्शक ठरेल. असे उपक्रम प्रत्येक शाळेत राबविले गेले तर निश्चितच विद्यार्थ्यांचा भाषिक विकास व्हायला वेळ लागणार नाही. त्यांच्या उन्मनी लेखन कार्यास मनस्वी शुभेच्छा!

श्री. मंगेश चांदिवडे (संस्थापक/अध्यक्ष)
पारस काव्य, कला, जनजागृती संस्था (रजि.)
सानपाडा, नवी मुंबई.

# तज्ञांचे अभिप्राय



SHIKSHAN SANSTHA'S
Dharmaprakasa Sreenivasiah High School
Registration No. : A-18, List Permanent, Date : 16-01-1961
Plot No. 99-101, Scheme 6, Road No. 24, (C), Sion (W), Mumbai - 400 022. Tel.: 2407 23 30

Ref. No. 1210/2023-24
Date. 24-08-2023


प्रति,
मा. श्री. मनोहर साळवी
कार्यवाह, दादर सार्वजनिक
वाचनालय, दादर

विषय - प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणेबाबत

महोदय,
आमच्या शाळेत पुस्तक परिक्षण या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले आहे. या व्याख्यानासाठी कृपया आपण दि. 25-08-2023 रोजी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे ही नम्र विनंती.

I/C HEAD MASTER
D. S. HIGH SCHOOL.
SION (W). MUMBAI - 400022.

मनोहर साळवी




विद्यार्थ्यांसाठी सूचना

इ. ८ वी अ व इ. ९ वी अ च्या विद्यार्थ्यांसाठी रविवार दि. ३/९/२०२३ ११.०० वाजता सकाळी लेखक आपल्या भेटीला हा कार्यक्रम आयोजित केला आहे. सदर कार्यक्रम हा ग्रंथालय विभागामार्फत नवोपक्रम पुस्तक परिक्षण वाचनातून ग्रंथ वाचनाकडे याद्वारे आयोजित केला आहे. सदर कार्यक्रम हा ऑनलाईन 'झूम' दूरदृश्यप्रणालीद्वारे आयोजित केला आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला सहभागी व्हायचे आहे.

कार्यक्रम प्रमुख
सौ. मनिषा कडव
ग्रंथपाल

पर्यवेक्षक
प्र. मुख्याध्यापक

8 A - MR
9 A



U-DISE No.: 27230209238
SHIV SHIKSHAN SANSTHA'S
Dharmaprakasa Sreenivasiah High School
Registration No. : A-18, List Permanent, Date : 16-01-1961
Plot No. 99-101, Scheme 6, Road No. 24, (C), Sion (W), Mumbai - 400 022. Tel.: 2407 23 30


Ref. No. 1219/2023-24
Date. 01-09-2023

प्रति,
मा. श्रीम. शुभांगी पासेबंद
लेखिका, कलाकार

विषय - प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहण्याबाबत.

महोदया,
आमच्या शाळेच्या लेखक आपल्या भेटीला या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले आहे. या व्याख्यानासाठी आपण दि. 03-09-2023 या दिवशी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे ही नम्र विनंती.

I/C HEAD MASTER
D. S. HIGH SCHOOL.
SION (W). MUMBAI - 4000..



16-01-1961
Plot No. 99-101, Scheme 6, Road No. 24, (C), Sion (W), Mumbai - 400 022. Tel.: 2407 23 30

Ref. No. 1209/2023-24
Date. 24-08-2023


प्रति,
मा. श्री. मिलिंद आरोलकर
समन्वयक महाराष्ट्र मेंटॉर (?) वृत्तपत्र

विषय - प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहण्याबाबत.

महोदय,
आमच्या शाळेत पुस्तक परिक्षण या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले आहे. या व्याख्यानासाठी आपण दि. 26-08-2023 या दिवशी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे ही नम्र विनंती.

उपयुक्त उपक्रम, ...

I/C HEAD MASTER
D. S. HIGH SCHOOL.
SION (W). MUMBAI - 400022.




कार्यक्रमपत्रिका

ग्रंथपरिक्षण हस्तलिखीत

कवितांचे हस्तलिखीत

कार्यशाळा

**गुगल ड्राईव्ह फोटो लिंक–**

https://drive.google.com/drive/folders/15i5qFP2O3EBaTLowb1q1E3hAAQZ2Dpud

**ब्लॉग लिंक –**

manishalibrarian.blogspot.com

युट्युब लिंक

https://youtu.be/3ChN-jXQyJc?si=Gv1NYmMygWx_AGif

# परिशिष्टे

## संदर्भ ग्रंथ यादी

| क्र. | शीर्षक | लेखक | प्रकाशक | संस्करण | मूळची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गणगोत | पु ल देशपांडे | मौज प्रकाशन गृह | १४ वी २००६ | ८० |
| २ | झाडाझडती | विश्वास पाटील | राजहंस प्रकाशन पुणे | २२ सप्टेंबर १९९१ | १७५ |
| ३ | समिधा | साधना आमटे | रामदास भटकळ पॉप्युलर प्रकाशन | १९२४ | २०० |
| ४ | मुसाफिर | अच्युत गोडबोले | मनोविकास प्रकाशन पुणे | २७ सप्टेंबर २०१२ | २५० |
| ५ | मास्तरांची | कृष्णाबाई नारायण सुर्वे | नम्रता मुळे डिंपल पब्लिकेशन | ३ जानेवारी २०१४ | २५० |
| ६ | आई समजून घेताना- | उत्तम कांबळे | प्रकाश विश्वासराव | जुलै २००८ | १५० |
| ७ | मन मे है विश्वास | विश्वास नांगरे पाटील | दिलीप माजगावकर | १७ वी जानेवारी २०१७ | २५० |
| ८ | प्रकाश वाटा | प्रकाश आमटे | समकालीन प्रकाशन पुणे | ६ डिसेंबर २०१० | २०० |
| ९ | व्यक्ती आणि वल्ली | पु ल देशपांडे | मौज प्रकाशन गृह | २००८ | १०० |
| १० | जोहड | सौ सुरेखा शहा | सुमेरू प्रकाशन डोंबिवली | मार्च २००२ | २६० |
| ११ | हाती ज्यांच्या शून्य होते | अरुण शेवते | प्रकाश अरुण शेवते | दोन ऑक्टोंबर २०१४ | २२५ |
| १२ | माझी जन्मठेप | विनायक दामोदर सावरकर | हिमानी सावरकर | मार्च २०१२ | १०० |
| १३ | फकिरा | अण्णा भाऊ साठे | सुरेश एजन्सी | ३४ वी | १३५ |
| १४ | क-हेचें पाणी खंड 1 ते 5 | आचार्य प्र. के. अत्रे | परचुरे प्रकाशन मंदिर | ३५ वी | २२५ |

| क्र. | शीर्षक | लेखक | प्रकाशक | संस्करण | मूळची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १५ | ग्रामगीता | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | राष्ट्रसंत साहित्य प्रचार मंडळ | १९७९ | १५० |
| १६ | गोष्टी माणसांच्या | सुधा मुर्ती | मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे | २६ वी, २०२० | २०० |
| १७ | बनगरवाडी | व्यंकटेश माडगूळकर | मौज प्रकाशन गृह | ३० वी २०१४ | २२५ |
| १९ | हाती ज्यांच्या शून्य होते | अरुण शेवते | ऋतुरंग प्रकाशन | प्रथम २००५, ५वी २०१९ | २२५ |
| २० | बहिणाईंची गाणी | कै. बहिणाबाई चौधरी | सुचित्रा प्रकाशन, मुंबई | १ली १९५९, ३२वी २०२१ | १५० |
| २१ | राऊ | ना. सं. इनामदार | कॉन्टिनेन्टल प्रकाशन | १ली १९७४, ४ थी २०१९ | ४०० |
| २२ | मेड इन इंडिया | पुरुषोत्तम बोरकर | श्रीविद्या प्रकाशन | ४थी २०१२ | ३०० |
| २३ | जिप्सी (कविता संग्रह) | मंगेश पाडगावकर | मौज प्रकाशन | १ ली १९७८, २० वी २०१६ | १२५ |
| २४ | धिंड | शंकर पाटील | मेहता पब्लिशिंग हाऊस | २४ सावी १९९५ | १३० |
| २५ | लिहावे नेटके – चार पुस्तकांचा संच | माधुरी पुरंदरे | ज्योत्स्ना प्रकाशन | नवीन आ. | २०३ |
| २६ | जगायचय प्रत्येक सेकंद | मंगला केळवे | ग्रंथाली प्रकाशन | 3री २०१६ | १३० |
| २७ | बर्म्युडा ट्रँगल | विजय देवधर | श्रीराम प्रकाशन | 20वी २०१७ | २७५ |
| २८ | आकाशाशी जडले नाते | डॉ. जयंत नारळीकर | राजहंस प्रकाशन | २०१९ | १३०० |

# नवोपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांची यादी

| क्रमांक | नाव |
|---|---|
| १ | आंग्रे श्रावणी |
| २ | दळवी गार्गी |
| ३ | गायकवाड आरोही |
| ४ | गवस हरिप्रिया |
| ५ | घाडीगावकर सानिका |
| ६ | गुरव आर्या |
| ७ | जाधव प्राजक्ता |
| ८ | कदम मनाली |
| ९ | कटके अवनी |
| १० | कटके श्रीयशी |
| ११ | मोरे वैष्णवी |
| १२ | पाटील प्रियंका |
| १३ | पुकळे श्रावणी |
| १४ | रहाटवळ दुर्वा |
| १५ | सजगाने स्नेहल |
| १६ | साळुंके श्रितीजा |
| १७ | शर्मा अक्षिता |
| १८ | शेंडगे सानिका |
| १९ | शिंदे गायत्री |
| २० | सोनावणे सुनीता |
| २१ | ताटपूजे ईश्वरी |
| २२ | तरडे सिद्धी |

| क्रमांक | नाव |
|---|---|
| २३ | टेंभे वेदिका |
| २४ | वारे कोमल |
| २५ | भोसले अक्षय |
| २६ | ढोकरे सात्विक |
| २७ | गायकवाड अथर्व |
| २८ | कांदेकर समर्थ |
| २९ | कारळे शरद |
| ३० | काटकर हर्ष |
| ३१ | कोबनाक आदित्य |
| ३२ | कोळपे मयूर |
| ३३ | लुबाळ आशुतोष |
| ३४ | मासाळ श्रेयस |
| ३५ | पाटकर अभिषेक |
| ३६ | पवार हेमराज |
| ३७ | रामाने देवा |
| ३८ | शिंदे संकेत |
| ३९ | शिंदे सार्थक |
| ४० | वीरकर गणेश |
| ४१ | वीरकर श्रेयस |
| ४२ | वराडकर चिन्मय |
| ४३ | वराडकर तन्मय |
| क्रमांक | नाव |
| ४४ | भोसले दर्शनी |
| ४५ | भोसले स्वानंदी |

| क्रमांक | नाव |
|---|---|
| ४६ | धोंडे मुग्धा |
| ४७ | गाढवे स्वरा |
| ४८ | घाडीगावकर वेदांती |
| ४९ | जाधव मैत्री |
| ५० | जाधव रीना |
| ५१ | जाधव श्रेया |
| ५२ | जुवळेकर उन्नती |
| ५३ | काजारे सायली |
| ५४ | करंबळेकर समीक्षा |
| ५५ | खामकर विधि |
| ५६ | कोळी हिमाली |
| ५७ | कोळी संस्कृती |
| ५८ | मैत्री संस्कृती |
| ५९ | माने रिया |
| ६० | माटवणकर धनश्री |
| ६१ | परब निरजा |
| ६२ | राणे रुचिता |
| ६३ | राऊत सुमेधा |
| ६४ | रिसबूड स्वरा |
| ६५ | सदाफुले मीरा |
| ६६ | सदाफुले उन्नती |
| ६७ | सकपाळ श्रावणी |
| ६८ | सावंत नुपूर |
| ६९ | सावळे आकृती |

| क्रमांक | नाव |
|---|---|
| ७० | शिंदे समृद्धी |
| ७१ | पोटफोडे यशस्वी |
| ७२ | तुपे समीक्षा |
| ७३ | वाघमोडे साक्षी |
| ७४ | झिमल प्राची |
| ७५ | अभिमाने विवेक |
| ७६ | भुतकर तेजस |
| ७७ | दबडे वेदांत |
| ७८ | दोरगे श्रवण |
| ७९ | गायकवाड आदित्य |
| ८० | गावंड वर्णेश |
| ८१ | कारकर सिद्धेश |
| ८२ | महंगारे आयुष |
| ८३ | वापरले अथर्व |
| ८४ | शेंडगे विराज |

## नवोपक्रम पूर्व चाचणी

1. आपण वाचलेल्या पुस्तक परिक्षण कात्रणांची संख्या ?

- 1 ते 3
- 4 ते 6
- 7 ते 10
- 11 ते 25

2. आपण वाचलेल्या पुस्तक परिचयाच्या कात्रणांपैकी किती मूळ पुस्तकांचे वाचन केले ?

- 1ते 3
- 4 ते 6
- 7 ते 8
- 0

3 .या उपक्रमादरम्यान आपण वाचलेल्या किती पुस्तकांचे परिक्षण केले आहे ?

- 1ते3
- 4ते5
- 5ते8
- 0

4.आपण अशाप्रकारे वर्तमानपत्रातून येणाऱ्या कात्रणांचा संग्रह केला आहे का ?

- हो
- नाही
- प्रतिसाद नाही

5.वर्तमानपत्रातून येणाऱ्या नाटकांचे परिक्षण सिनेमांचे परिक्षण वाचता का ?

- हो
- नाही
- प्रतिसाद नाही

6. आपल्यापैकी कोणाला पुस्तक परिक्षण लिहिण्याचा छंद आहे का ?

- हो
- नाही
- प्रतिसाद नाही

7. आपल्यापैकी कोणाला कथा किंवा कविता लिहिण्याचा छंद आहे का ?

- हो
- नाही
- प्रतिसाद नाही

## नवोपक्रम उत्तर चाचणी

1. आपण वाचलेल्या पुस्तक परिक्षण कात्रणांची संख्या ?

- 1 ते 3
- 4 ते 6
- 7 ते 10
- 11 ते 25

2. आपण वाचलेल्या पुस्तक परिचयाच्या कात्रणांपैकी किती मूळ पुस्तकांचे वाचन केले ?

- 1ते 3
- 4 ते 6
- 7 ते 8
- 0

3 .या उपक्रमादरम्यान आपण वाचलेल्या किती पुस्तकांचे परिक्षण केले आहे ?

- 1ते3
- 4ते5
- 5ते8
- 0

4.आपण अशाप्रकारे वर्तमानपत्रातून येणाऱ्या कात्रणांचा संग्रह केला आहे का ?

- हो
- नाही
- प्रतिसाद नाही

5.वर्तमानपत्रातून येणाऱ्या नाटकांचे परिक्षण सिनेमांचे परिक्षण वाचता का ?

- हो
- नाही
- प्रतिसाद नाही

6. आपल्यापैकी कोणाला पुस्तक परिक्षण लिहिण्याचा छंद आहे का ?

- हो
- नाही
- प्रतिसाद नाही

7. आपल्यापैकी कोणाला कथा किंवा कविता लिहिण्याचा छंद आहे का ?

- हो
- नाही
- प्रतिसाद नाही

# धन्यवाद